साहसिक
सजग समाजाचा दक्ष प्रहरी
मुख्य संपादक : रवींद्र एन. कोटंबकार
मो.नं. ९०९६९६८३४०
कार्यालय : ब्लॉक नं. ७४,७५रजत संकुल, रॉय उद्योग परिसर, बसस्थानकच्या समोर, गणेशपेठ, नागपूर-१८
E-mail : dsahasikngp@gmail.com
श्री. अकिल अहमद उर्फ गुड्डभाई
नागपूर विभाग संपादक
मो.नं. ९११२२७४११०

दैनिक
# साहसिक
सजग समाजाचा दक्ष प्रहरी
epaper
www.dsahasik.in








वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, अमरावती, अकोला, बुलडाणा, वाशिम,यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली, दिल्ली व मुंबई येथुन एकाचवेळी प्रकाशित ...!

वर्ष : १५ | अंक : ५४ | शनिवार २१ ऑगस्ट २०२१ | मुख्य संपादक : रविंद्र एन. कोटंबकार | (पृष्ठ -८) | मूल्य : ३ रुपये


### सुविचार

आपले ध्येय उच्च ठेवा
आणि आपण ते प्राप्त
करेपर्यंत थांबु नका.

### चारोळी

सावली नकोस शोधु ,
ती आपल्या जवळच असते,
नजर फक्त मागे वळव,
डोळ्यांच्या कडेला ती हळुच
दिसते

### हसा जरा जपून..

पिंटया: गोव्याला चाललोय जातांना रस्त्यात बायकोला दरीत
टाकून देणार आहे,
चिंटया: माझी पण घेऊन जा आणि ढकल,
पिंटया: तुझी येतांना ढकलली तर
चालेल का ?

## मुंबई पोलिसांनी १९ जणांवर केला गुन्हा दाखल

### भाजपच्या जन आशीर्वाद यात्रेत कोरोना नियमांचे उल्लंघन

**वृत्तसंस्था / २० ऑगस्ट**

**मुंबई:** राज्यभरात भाजपच्यावतीने जन आशीर्वाद यात्रा सुरु आहे. केंद्रीय सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्री नारायण राणे यांनीदेखील काल मुंबई विमानतळावरुन आपल्या जन आशीर्वाद यात्रेला सुरुवात केली. दरम्यान, मुंबईत कोरोना नियमांचे उल्लघंन करत जन आशीर्वाद यात्रा काढल्याप्रकरणी १९ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामध्ये जास्तीत जास्त आयोजकांचा समावेश आहे. यात्रेदरम्यान, कार्यकर्त्यांनी सोशल डिस्टेन्सिंगचा उल्लघंन केला आहे. विशेष म्हणजे अनेक कार्यकर्त्यांनी मास्कदेखील घातले नव्हते. त्यामुळे ही कारवाई करण्यात आली असल्याची सांगण्यात येत आहे.

केंद्रीय सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्री नारायण राणे यांनी आपल्या जन आशीर्वाद यात्रेला मुंबई विमानतळावरुन सुरुवात केली. त्यानंतर त्यांनी शिवाजी पार्कमधील बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतीस्थळावर जाऊन आशीर्वाद

(उर्वरित पान २ वर)

# समृद्धी महामार्गाच्या कामावरुन परतणाऱ्या मजुरांवर काळाचा घाला; १३ मृत्यू, ३ गंभीर जखमी



**साहसिक वृत्त / २० ऑगस्ट**

**बुलडाणाः** जिल्ह्यातील दुसरबीडजवळील तढेगावमध्ये मोठा अपघात झाले आहे. सिंदखेडराजा-मेहकर महामार्गावरील तढेगाव फाट्यावर हा अपघात घडला आहे. दरम्यान, समृद्धी महामार्गावर काम करणाऱ्या मजुरांना घेऊन जाणारे ट्रक तढेगाव फाट्याजवळ रस्त्याच्या कडेला उटल्याने हा अपघात घडला आहे. या दुर्घटनेत आतापर्यंत १३ लोक ठार झाले असून ३ लोक गंभीर जखमी असल्याचे सांगितले जात आहे. ही घटना आज दुपारी १२:३० वाजेच्या दरम्यान घडली आहे.

किनगाव पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या दुर्घटनेत मृतांचा आकडा आणखी वाढण्याची शक्यता आहे. या दुर्घटनेत अनेक लोकांचा मृत्यू झाला असून गंभीर जखमींना जालना येथील रुग्णालयात हलवण्यात आले आहे. तर यातील तीन रुग्णांवर सिंदखेडराजा येथील प्राथमिक उपचार केंद्रात उपचार सुरु आहे.

**अशी घडली घटना?**

सिंदखेडराजा- मेहकर महामार्गावर बसला साईड देत असतांना रस्त्याच्या बाजूला उभा केलेला ट्रक (क्र. एम.एच. ११ सीएच ३७२८) पावसामुळे रस्ता खचून कलंडला व अपघाताने रस्त्याच्या खाली पूर्णपणे उलटला. त्यामुळे टिप्परच्या मागच्या भागात लोखंडी बारवर बसलेले १६ जण त्याखाली दबले गेले. दरम्यान, या दुर्घटनेत १३ जणांचा जागीच मृत्यू झाल्याची माहिती किनगाव राजा पोलिसांनी दिली आहे.

**मृतांची ओळख अद्याप पटली नाही**

या अपघातात अनेक मजुरांचा मृत्यू झाला आहे. समृद्धी महामार्गावरील कामावरुन परतताना काळाने या मजुरांवर घाला घातला. यामध्ये १६ पैकी १३ जणांचा मृत्यू झाला आहे. हे सर्व मजूर समृद्धी महामार्गाच्या कामासाठी मध्यप्रदेशातील खरगोन येथून आलेले होते. परंतु, मृतांची ओळख अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही. वाचलेल्या तिघांमध्ये एका पाचवर्षीय मुलीचा समावेश आहे.

# विघातक शक्ती काही काळासाठी राज्य करू शकतील, कायमस्वरुपी नाही-नरेंद्र मोदी



**वृत्तसंस्था / २० ऑगस्ट**

**नवी दिल्ली :** दहशतवादाद्वारे साम्राज्य निर्माण करण्याच्या विचारधारेचे पालन करणाऱ्या विघातक शक्ती, काही काळासाठी वर्चस्व गाजवू शकतील परंतु त्यांचे अस्तित्व कायमचे नाही. ते मानवतेला कायमस्वरूपी दडपू शकत नाहीत. असं पंतप्रधान मोदी यांनी म्हटलं आहे. अफगाणिस्तानवर तालिबानने कब्जा मिळवल्याच्या पार्श्वभूमीवर मोदींनी हे विधान केलं आहे. गुजरातमधील प्रसिद्ध सोमनाथ मंदिराच्या काही प्रकल्पांच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी मोदींनी म्हटले की, सोमनाथ मंदिर अनेकदा तोडलं गेलं, अनेकदा मूर्तींची तोडफोड केली गेली आणि याचे अस्तित्व संपवण्याचा प्रयत्न केला गेला. परंतु हे प्रत्येक विघातक हल्ल्यानंतर आपल्या पूर्ण गौरवाने समोर आले, जे आपल्याला आत्मविश्वास देते. मोदी म्हणाले की, विनाशासाठी प्रयत्न करणाऱ्या आणि दहशतवादाने साम्राज्य निर्माण करण्याच्या विचारधारेचे पालन करणाऱ्या विघातक शक्ती, काही काळासाठी वर्चस्व गाजवू शकतात परंतु त्यांचे अस्तित्व कायमचे नाही. ते मानवतेला कायमस्वरूपी दडपू शकत नाहीत. हे खरं होतं जेव्हा सोमनाथ मंदिराला अगोदर नष्ठ केलं जात होतं आणि ते आजही खरं आहे. तसेच, २०१३ मध्ये प्रवास व पर्यटनाच्या यादीत ६५ व्या क्रमांकावर असलेला, भारत आता २०१९ मध्ये ३४ व्या स्थानावर पोहचला आहे. अशी देखील यावेळी मोदींनी माहिती दिली.

# भाजप नेत्यांवर हल्ला:किरीट सोमय्या यांच्या गाडीवर दगडफेक



**वृत्तसंस्था / २० ऑगस्ट**

**वाशिमः** भाजपचे ज्येष्ट नेते किरीट सोमय्या यांच्या गाडीवर आज दुपारी वाशिममध्ये हल्ला करण्यात आला आहे. दरम्यान, या हल्ल्यात हल्लेखोरांना सोमय्या यांच्या गाडीवर दगडफेक आणि शाईने हल्ला केला. यामध्ये गाडीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. ही घटना वाशिममधील बालाजी पार्टिकल बोर्ड कारखान्याजवळ घडली आहे. हा कारखाना वाशिमच्या स्थानिक शिवसेना खासदार भावना गवळी यांच्या समर्थकांचे असल्याचे सांगितले जात आहे.

(उर्वरित पान २ वर)

# लोकल रेल्वे व सर्व ऑफिसेसमध्ये व्हॅक्सीनचे बंधन घालणाऱ्या शासनाच्या बेकायदेशीर आदेशाला उच्च न्यायालयात आव्हान

*** केंद्र सरकारच्या निर्देशाविरुद्ध आदेश काढणारे महाराष्ट्र शासनाचे मुख्य सचिव व इतर दोषी अधिकाऱ्यांविरुद्ध राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ चे कलम ५१ (b), ५३, ५४, ५५, ५६ व भादंवि चे कलम १६६, १८८, १२०(B), ३४ आदी कलमाअंतर्गत फौजदारी कारवाई करण्याची मागणी.**
*** नागरिकांच्या जीवाशी खेळणाऱ्या शासनाने तोडले अकलेचे तारे.**
*** महाराष्ट्र सरकारकडून नागरिकांच्या मुलभूत अधिकारांचे उल्लंघन.**
*** रेल्वे मध्ये किंवा कोठेही लस (वॅक्सीन) घेतलेले व न घेतलेल्यांमध्ये भेदभाव करता येणार नसल्याचे केन्द्र सरकारने दिलेले निर्देश व सर्वोच्च, उच्च न्यायालयांच्या आदेशाची अवमानना.**
*** व्हॅक्सीन कंपनीला हजारो कोटीच्या गैरफायदा पोहचविण्यासाठी शासनातर्फे बेकायदेशीर नियमांची अंमलबजावणी.**
*** सी.बी.आय.चौकशीची मागणी.**

**वृत्तसंस्था / २० ऑगस्ट**

**मुंबई:** केंद्र सरकारने व देशातील विविध न्यायालयांनी वेळोवेळी निर्णय देवून स्पष्ट कायदा ठरवून दिला आहे की कोरोना ची लस (वॅक्सीन) घेणाऱ्या व्यक्तीला सुद्धा पुन्हा कोरोनाची लागण होऊ शकते व तो सुद्धा कोरोनाचा संसर्ग पसरवू शकतो त्यामुळे त्या व्यक्तीला सुद्धा वॅक्सीन न घेतलेल्या व्यक्तीप्रमाणेच सर्व निर्बंध लागू राहतील. लस घेतलेल्या व्यक्तीमध्ये आणी लस न घेतलेल्या व्यक्तीमध्ये कोणताही फरक नसतो त्यामुळे त्यांच्यामध्ये कोणताही भेदभाव करता येणार नाही. जर लस न घेणाऱ्यांसोबत भेदभावपूर्ण वागणूक करुन त्यांना कोणत्याही लाभापासून वंचित ठेवल्यास ते नागरिकांच्या घटनादत्त मुलभूत अधिकारांचे उल्लंघन ठरते.

परंतु महाराष्ट्र सरकारने दि. १० ऑगस्ट व ११ ऑगस्ट च्या आदेशान्वये व्हॅक्सीनचे दोन डोज घेणाऱ्यांना लोकल ट्रेन मध्ये जाण्याची परवानगी देवून व्हॅक्सीन न घेणाऱ्या लोकांच्या मुलभूत अधिकारांचे उल्लंघन केल्यामुळे ते बेकायदेशीर आदेश रद्द करण्याकरीता मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे.

'अवेकन इंडिया मुव्हमेंट' चे फिरोज मिठीबोरवाला यांनी ती याचिका दाखल केली आहे. त्या याचिकेमध्ये बेकायदेशीर आदेश पारीत करणारे महाराष्ट्राचे मुख्य सचिव सीताराम कुंटे, अप्पर सचिव श्रीरंग घोलप, मुंबई महापालिका आयुक्त इकबाल चहल यांना उत्तरवादी बनविण्यात आले आहे. आणि त्यांच्याविरुद्ध फौजदारी कारवाईची मागणी करण्यात आली आहे.

याचिकेची प्रत:-
https://drive.google.om/file/d/1faalsVdH7Ff2j7o8p3IN_eDJDIs2JO-b/view?usp=sharing

लस (वॅक्सीन) घेणे किंवा न घेणे हे ऐच्छिक असून त्याकरीता कोणालाही प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष दबाव आणता येणार नाही असा स्पष्ट कायदा सर्वोच्च न्यायालय, दिल्ली व इतर विविध उच्च न्यायालय यांनी ठरवून दिला आहे.

तसेच गुवाहाटी उच्च न्यायालय, मणीपूर, त्रिपुरा, मेघालय आदि बऱ्याच उच्च न्यायालयाने कोरोना लसी संदर्भात असे भेदभाव करणारे राज्य शासनाचे आदेश स्थगीत व खारीज केले आहेत.

भारत सरकारचे केंद्रातील निर्देश खालील लिंक वर उपलब्ध आहेत.
https://drive.google.com/file/d/1DVWL0m4Do08uZJBZ7P5Y_URwyxza-r-t/view?usp=sharing

परंतू व्हॅक्सीन माफियांकडून नागरिकांना विविध प्रकारे दबाव व भिती दाखवूनही लोक व्हॅक्सीन घेण्यासाठी तयार नसल्यामुळे आता व्हॅक्सीन कंपन्यांनी भ्रष्टाचार करुन काही अधिकाऱ्यांना हाताशी धरुन गैरमार्गाचा अवलंब करुन नागरिकांना लस घेण्याकरीता रेल्वे पास, पगार रोखणे, राज्यात येण्यास बंदी आदी विविध माध्यामातून दबाव बनविण्यास सुरुवात केली आहे.

त्या भ्रष्टाचाराचाच एक भाग म्हणून महाराष्ट्र सरकारने अकलेचे तारे तोडत दि. १५ जुलै २०२१ रोजीच्या आदेशानुसार महाराष्ट्र राज्यात प्रवेश करण्यासाठी कोरोना लसीचे (वॅक्सीनचे) दोन्ही डोज आवश्यक करुन लस घेतलेल्यांनाच प्रवेश दिला जाईल असा फतवा जारी केला असून दि. १० व ११ ऑगस्ट च्या निर्देशानुसार लोकल ट्रेन मध्ये सुद्धा असाच बेकायदेशीर निर्णय घेण्यात आला आहे व केवळ व्हॅक्सीन घेतलेल्याच लोकांना लोकल ट्रेन मध्ये प्रवास करण्याची परवानगी देण्यात आली आहे. त्याविरोधात उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. लवकरच आणखी अनेक याचिका दाखल करण्यात येणार असून वॅक्सीन घेण्यासाठी अप्रत्यक्ष दबाब बनवून व्हॅक्सीन माफिया असलेल्या 'अदार पुनावाला' व इतर आरोपींना गैरफायदा पोहचविण्यासाठी हा सर्व कट रचण्यात आल्यामुळे प्रकरणात सी.बी.आय. मार्फत चौकशी करुन आरोपी अधिकारी व कटात सामील इतर लोकां विरुद्ध भादवि ४०९, १२०(B) ३४ कलमां अंतर्गत फौजदारी कारवाई करण्याची मागणी करण्यात येणार असल्याची माहिती इंडियन बार एसोसिएशनतर्फे देण्यात आली आहे. वरील सर्व न्याय-निवाडे, आदेश इत्यादि हे इंडियन बार एसोसिएशन (Indian Bar Association) या वेबसाईटवर उपलब्ध आहेत.

**वेबसाईटः** www.indian-barassociation.in

कोरोनाची लस ही केवळ प्रायोगिक चाचणी स्तरावर असून लसीचे अनेक जीवघेणे दुष्परीणाम सुद्धा आहेत. अनेक लोकांना लस घेतल्यामुळे मृत्यू, आंधळेपणा, रक्त गोठून मृत्यू, लकवा (पक्षाघात), बहिरेपणा, हृदयाचे झटके, आवाज जाणे (मुकेपणा) असे विविध गंभीर दुष्परीणाम झाल्याचे पुरावे असून कोरोनाचे दोन्ही डोज घेणारे अनेक डॉक्टर्स व नागरिकांचा मृत्यू कोरोनानेच झाल्याचे पुरावे शासनाकडे उपलब्ध आहेत.

व्हॅक्सीन ही प्रभावी नसल्याबाबतची माहिती खुद्द मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी त्यांच्या दि. २ एप्रिल २०२१ रोजीच्या जनतेस उद्देशून केलेल्या भाषणात दिली होती. (१६ मिनिटावर पहावे)

**लिंक:**https://www.youtube.com/watch?v=CMdiiWpUhEo

इंडियन मेडिकल असोसिएशन चे पूर्व अध्यक्ष के. के. अग्रवाल व दिल्लीतील ६० डॉक्टर्स ज्यांनी कोरोना लसीचे दोन्ही डोस घेतले होते त्यांच्या मृत्यू कोरोनानेच झाला होता.

**लिंक:**
(i)https://www.ndtv.com/india-news/dr-kk-aggarwal-ex-chief-of-india-medical-association-ima-dies-of-covid-19-coronavirus-2443827
(ii) https://theprint.in/health/at-least-60-delhi-doctors-have-died-in-2nd-covid-wave-families-are-left-to-pick-up-pieces/661353/

ठाणे येथील ७५ डॉक्टर्स चा मृत्यू कोरोनाने झाल्याची बातमी दि. १ जुलै २०२१ रोजी दै. लोकमत मध्ये प्रकाशित झाली होती.

**लिंक:**
https://drive.google.com/file/d/1eZGQoHzzl4pUShRYt7U0YZ82zvJ4UYEn/view?usp=sharing

असे असतांना त्याच 'अप्रभावी'ङ लसीचे गुण-दोष लपवून केवळ लस हाच उपाय असल्याचे भासवून जनतेची फसवणूक करून जनतेवर प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रीत्या दबाव टाकून त्यांना लस घेण्यास भाग पाडून त्यांचा जीव धोक्यात टाकून लस निर्माता कंपनीला हजारो कोटींचा गैरफायदा पोहचविण्यासाठी शासकीय यंत्रणेचा दुरुपयोग केल्याप्रकरणी सर्व आरोपी अधिकारी व राजकीय नेते यांच्याविरुद्ध भादंवि ५२, ४२०, ३०४, ३०२, ११५, ४०९, ४७१, ४७४, ५११ r/w १२०(B), ३४ आणि आपत्ती व्यवस्थापन कायदा चे कलम ५१, ५२, ५३, ५४, ५५, ५६ व कायदयातील इतर तरतुदींअंतर्गत फौजदारी कारवाई करण्याची मागणी विविध संघटनांनी केली आहे.

याशिवाय केंद्र सरकारच्या आरोग्य मंत्रालयाने त्यांच्या दि. २७ मे २०२१ च्या आदेशानुसार मास्क लावणे बंधनकारक नसून ऐच्छिक असल्याचे व निरोगी लोकांना मास्क लावण्याची आवश्यकता नसल्याचे माहिती अधिकाराअंतर्गत कळविले आहे.

**लिंक:**
https://drive.google.com/file/d/10f35twtB2sUl_-RWtb2vgsJK70YGAPfP/view?usp=sharing

मग असा प्रश्न उपस्थित होतो की मुंबई महापालिकेने मास्क न लावण्याच्या कारणावरुन नागरिकांना वेठीस धरुन ६० कोटी रुपयांपेक्षा जास्त दंड कसा वसूल केला?

या आधीसुद्धा असाच गैरकायदेशीर पणा करणारे महाराष्ट्राचे तत्कालीन वनमंत्री स्वरुपसिंह नाईक व शासनाचे अति. मुख्य सचिव अशोक खोत यांना न्यायालयाच्या आदेशाच्या विरुद्ध जावून निर्णय घेवून न्यायालयाची अवमानना

(उर्वरित पान २ वर)